| | | |
|---|---|---|
| ३ | जलप्रदायविभागाची कार्यपद्धती, तसेच पर्यपेक्षण आणि उत्तरदायित्व प्रणाली | नागपूर शहराचे पाणी पुरवठयाकरीता पाण्याचे स्त्रोतापासून कच्चे पाणी उचलणे, त्याचे शुध्दीकरण करणे, साठविणे व वितरण प्रणालीतून उपभोक्त्यांना दिलेल्या नळ कनेक्शनद्वारे उपभोक्त्यांना पाणी पुरविणे, पाण्याचे मोजमाप करून मंजुर दरांनुसार पाणीपट्टीची देयके तयार करणे, ती ग्राहकांना तामिल करणे, पाणीपट्टी वसूल करणे, वितरण व्यवस्थेतील गळत्या दुरूस्त करणे, जलवाहिन्या नसलेल्या भागात टँकरद्वारे पाणीपुरवठा करणे, उपभोक्त्यांच्या तक्रारीचे निवारण करणे. ही कामे पार पाडणेकरीता संपूर्ण शहराला दहा झोनमध्ये विभाजित करण्यात आले असून झोन निहाय ही कर्तव्ये पार पाडली जातात. १ मार्च २०१२ पासुन झोन निहाय ही कामे जलप्रदाय विभागाचे वतीने ऑपरेटर- आपले कर्मचाऱ्यांद्वारे पार पाडत आहे व जलप्रदाय विभागाचे कर्मचारी त्यावर नियंत्रण ठेवीत आहेत. |